# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 27 August 2025

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक २७ ऑगस्ट २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- आज गणेश चतुर्थी–सार्वजनिक आणि घरगुती गणेश आगमनाचा सर्वत्र उत्साह
- गुजरातमध्ये इलेक्ट्रिक वाहन बॅटरी निर्मिती प्रकल्प–'ई वितारा'चं पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन; मेक इन इंडियाच्या प्रवासात एक नवा अध्याय जोडल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
- कामगारविषयक कायद्यांमधे सुधारणा, विमुक्त जाती आणि भटक्या जमाती संवर्गासाठी मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय
- नांदेड ते मुंबई वंदे भारत रेल्वेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हिरवा झेंडा

आणि

- मराठवाड्यात हवामान विभागाकडून बहुतांश जिल्ह्यांना या आठवड्यात पावसासाठी यलो अलर्ट

****

आज भाद्रपद शुद्ध चतुर्थी अर्थात गणेश चतुर्थी. गणेशोत्सवाला आजपासून प्रारंभ होत आहे. यंदा गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा मिळाल्यानं या उत्सवाची सांस्कृतिक ओळख आता आणखी दृढ होणार आहे. गणेशोत्सवाच्या तयारीचा संक्षिप्त आढावा घेणारा हा वृत्तांत...

**आबालवृद्धांच्या लाडक्या गणरायाचं आज घरोघरी तसंच चौकाचौकातल्या सार्वजनिक गणेश मंडळांच्या मंचावर आगमन होत आहे. गणेशाच्या स्वागताची तयारी पूर्ण होत आली आहे. घरोघरी गणेशाची स्थापना ज्यात करायची, त्या मखरांमध्ये नाना प्रकार उपलब्ध झाले असून,**

**सार्वजनिक मंडळांचे मंडप जवळपास तयार झालेत. विद्युत रोषणाईच्या माळांनी बाजारपेठांमधले रस्ते झगमगत आहेत. गणपतीबाप्पाची आवडती फुलं, दुर्वा आणि नैवेद्यासाठी मोदकांसह विविध पदार्थांची बाजारपेठांमध्ये रेलचेल दिसून येत आहे, गणेश मंडळांच्या ढोलपथकांचे सरावही आता शिगेला पोहोचले आहेत. आपल्या घरचा गणपती दीड दिवसाचा असो किंवा दहा दिवसांचा, गणेशभक्तांचा उत्साह मात्र कुठेही कमी दिसत नाहीये.**

गणरायाच्या आगमनापासून ते विसर्जनापर्यंत उत्सव सुरळीत पार पाडण्यासाठी ठिकठिकाणचं स्थानिक प्रशासन, पोलीस यंत्रणा सज्ज झाल्या आहेत.

छत्रपती संभाजीनगरसह जिल्हाभरात गणेश मूर्ती विक्री केंद्र उभारण्यात आले आहेत. गणरायाच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्वच मुख्य बाजापेठांमध्ये चैतन्य निर्माण झालं आहे.

परभणी इथल्या श्री शिवाजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणेश मूर्ती तयार केल्या. मातीपासून बनविलेल्या गणेश मूर्तीमध्ये झाडांच्या बिया टाकल्यामुळे, पर्यावरण वाचवा पृथ्वी वाचवा या घोषवाक्याला साजेशा या मूर्ती असल्याचं प्राचार्य डॉ.बाळासहेब जाधव यांनी सांगितलं.

****

गणेशोत्सवानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या. या सणातून नवीन ध्येयांसह सकारात्मकतेनं पुढे जाण्याची प्रेरणा मिळत असल्याचं राष्ट्रपतींनी संदेशात नमूद केलं आहे.

****

भारताच्या मेक इन इंडियाच्या प्रवासात एक नवा अध्याय जोडला जात असून मेक फॉर वर्ल्डच्या दिशेनं ही मोठी झेप असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. गुजरातमधल्या हंसलपूर इथं मेड इन इंडिया बॅटरी इलेक्ट्रिक वाहनं – 'ई वितारा'चं उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते काल झालं, त्यावेळी ते बोलत होते. या प्रकल्पामुळे भारत–जपान संबंधांना यामुळे नवा पैलू मिळेल, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला, ते म्हणाले.

**बाईट– पंतप्रधान नरेंद्र मोदी**

****

राज्यातल्या कामगारविषयक कायद्यांमधे सुधारणा करुन महाराष्ट्र कामगार संहिता नियम तयार करण्याच्या प्रस्तावाला राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत, विमुक्त जाती आणि भटक्या जमाती संवर्गातल्या लाभार्थ्यांना ओळखपत्रं, प्रमाणपत्रं तसंच विविध योजनांचा लाभ मिळवून देण्याची कार्यपद्धती प्रभावीरित्या राबवण्याचा निर्णयही या बैठकीत झाला. या निर्णयाचा आमच्या प्रतिनिधींनी घेतलेला हा आढावा....

***VJNT संवर्गातल्या नागरिकांना ओळखपत्रं तसंच प्रमाणपत्रं देण्यासाठी विविध ठिकाणी शिबिरांचं आयोजन केलं जाईल. केवळ घोषणापत्रावर आधारीत जातीचे दाखले दिले किंवा ग्रामसेवकांचे प्रमाणपत्र ग्राह्य मानून जातीचे दाखले दिले तर त्याचा गैरवापर होण्याची शक्यता असते. त्यामुळे यापुढे तहसिलदार आणि प्रांताधिकारी यांची खात्री झाल्यावरच तसेच जातीची स्थानिक पातळीवर चौकशी करुन खात्री झाल्यावर जातीचे दाखले दिले जाणार आहेत.***

***राज्यातल्या कामगार कायद्यांमध्ये सुधारणा करून महाराष्ट्र कामगार संहिता नियम तयार करण्यात आले आहे. त्यातल्या महाराष्ट्र व्यावसायिक सुरक्षा तसंच आरोग्य आणि कार्यस्थळ संहिता नियम, २०२५ चे प्रारूप केंद्र सरकारच्या सहमतीसाठी पाठवायला आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.***

***नागपूर - गोंदिया प्रवेश द्रुतगती महामार्गालाही राज्य सरकारनं आज मान्यता दिली. यामुळं तीन तासांचे अंतर सव्वा तासावर येणार आहे.बीड जिल्ह्यातल्या आष्टीमध्ये न्यायालय स्थापन करण्यासाठी खर्चाला मान्यता सरकारनं दिली. बीड जिल्ह्यातल्या ३ बंधाऱ्यांचा विस्तार यासारखे निर्णयही आजच्या बैठकीत झाले. यामुळे खरीप-रब्बी हंगामात शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढणार आहे.***

नांदेड ते मुंबई वंदे भारत रेल्वेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दूरस्थ पद्धतीने हिरवा झेंडा दाखवला. वंदे भारत एक्स्प्रेसमुळे नांदेड शहर हे राजधानी मुंबईच्या अधिक जवळ आलं असून यामुळे मराठवाड्याच्या समृद्धीचं दार उघडल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

या गाडीचा मराठवाड्यातल्या प्रमुख जिल्ह्यांना लाभ होईल, असा विश्वास माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी व्यक्त केला. खासदार अजित गोपछडे यांनी यावेळी बोलतांना नांदेड ते मुंबई विशेष रेल्वे सुरू करण्यासाठीही प्रयत्न करू असं सांगितलं.

****

बीड जिल्ह्यातल्या अंबाजोगाई इथं एक हजार १५० खाटांचं सुसज्ज शासकीय रुग्णालय उभारण्यात यावं, तसंच स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाचं काम दर्जेदार करावं अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या आहेत. स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामाबाबत काल मंत्रालयात झालेल्या बैठकीत पवार बोलत होते. या कामाचा आढावा घेऊन पवार यांनी आवश्यक सूचना दिल्या.

****

मराठा आरक्षण कार्यकर्ते मनोज जरांगे पाटील यांना पूर्वपरवानगीशिवाय मुंबईतील आझाद मैदानावर निदर्शनं करण्यास मुंबई उच्च न्यायालयाने मनाई केली आहे. उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मार्ने यांच्या पीठाने दिलेल्या आदेशानुसार, अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय शहरातील प्रमुख ठिकाणी कोणत्याही आंदोलनास परवानगी दिली जाणार नाही. मात्र, जरांगे यांना निदर्शनासाठी खारघर किंवा नवी मुंबईत जागा उपलब्ध करून देण्याचा पर्याय महाराष्ट्र सरकारसाठी खुला असल्याचंही न्यायालयानं स्पष्ट केलं आहे.

दरम्यान, जरांगे आपल्या समर्थकांसह आज मुंबईकडे प्रयाण करणार आहेत.

****

यंदाचा बी. रघुनाथ पुरस्कार लेखक प्रसाद कुमठेकर यांच्या `इतर गोष्टी`या कथासंग्रहाला जाहीर झाला आहे. ज्येष्ठ साहित्यिक बी.रघुनाथ यांच्या स्मृतीदिनी येत्या ७ सप्टेंबरला छत्रपती संभाजीनगर इथं कुमठेकर यांना हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात क्रीडा दिनाचं आयोजन करण्यात येणार आहे. तीन दिवस चालणाऱ्या या आयोजनात सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेण्याचं आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केलं आहे.

**बाईट– जिल्हाधिकारी दिलीप स्वामी**

****

कृष्णा पूर नियंत्रण प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मराठवाड्याच्या हक्काचे १६ पूर्णांक ६६ दशलक्ष घनमीटरपेक्षा अधिक पाणी मिळेल असा विश्वास आमदार राणा जगजित सिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे. ते काल धाराशिव इथं बोलत होते. जागतिक

बँकेच्या सहकार्याने राज्य सरकार या प्रकल्पावर काम करत असून त्यासंदर्भातला सर्वेक्षण अहवाल प्राप्त झाल्याचं त्यांनी सांगितलं.

****

नांदेड जिल्ह्यातील पूरग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या सुचनेवरून एक समिती गठीत करण्यात आली आहे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माणिकराव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्यांची समिती, उद्या गुरुवारी २८ ऑगस्टला मुखेड तालुक्याला भेट देऊन पूरग्रस्त भागाची पाहणी करणार आहे.

****

हवामान

मराठवाड्यात बहुतांश जिल्ह्यांसाठी पुढील तीन दिवस हवामान विभागानं पावसासाठी यलो अलर्ट जारी केला आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना आणि परभणी जिल्ह्यासाठी  बुधवार, गुरुवार, शुक्रवार आणि नांदेड जिल्ह्यासाठी आज आणि उद्या यलो अलर्ट जारी केला आहे.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जायकवाडी धरणाचा जलसाठा आता ९८ टक्क्यांवर पोहोचला आहे. धरणात ३० हजार दशलक्ष घनफूट प्रतिसेकंद वेगाने पाण्याची आवक असून, १८ हजार ८६४ दशलक्ष घनफूट प्रतिसेकंद वेगाने विसर्ग करण्यात येत आहे.

****